वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# आली रे आली... आता गुंडांची बारी आली

## मकोका अन् एमपीडीए अंतर्गत कारवाई करणार



### एसपी नवनीत काँवत यांनी सर्वांना एका लायनीत उभे करत दिली तंबी

बीड, (दिव्य न्युज):-पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी एकापाठोपाठ एक धडक ॲक्शन घ्यायला सुरूवात केली आहे. आठवडाभरापुर्वीच ५१ वाळू माफियांना बोलावून त्यांची परेड घेत पोलीसी खाक्यात समज दिल्यानंतर आता गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेल्या गुंडांची बारी आल्याचे दिसुन येत आहे. जिल्हाभरातील पोलीस ठाण्यांच्या रेकॉर्डवर असलेल्या गंभीर गुन्ह्यातील ७० जणांना पोलीस अधिक्षक काँवत साहेब यांनी आज दुपारी बोलावून घेतले होते. गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असणाऱ्या यापैकी काहींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येऊ शकते. याशिवाय ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत त्यांना समज देऊन यापुढे अशा प्रकारचे गुन्हे न करण्याबाबत तंबी दिली जाण्याची शक्यता आहे.

Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

दुपारनंतर ही परेड होणार असल्याचे समजते. जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेल्या रेकॉर्डवरील व्यक्तींना संबंधीत ठाणेप्रमुखांनी बोलावणे पाठवले आहे. त्या अनुषंगाने दुपारी उशिरापर्यंत अनेकजण पोलीस अधिक्षक कार्यालयात दाखल होत होते. दरम्यान आजच्या या परेडच्या माध्यमातून पोलीस अधिक्षक संबंधीत व्यक्तींना काय समज देतात ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे वारंवार दाखल झालेले आहेत. त्यांच्यावर काही कारवाई होते का ? हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे.

जिल्ह्यातील विविध प्रकारच्या गुन्ह्यातील ७० आरोपींना पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी कठोर इशारा दिला आहे. ▶▶ पान २ वर

# नोकरीच्या आमिषाने दोन तरुणांची १२ लाखांची फसवणूक

## नोकरीच्या आशेने शेती विकून तरुणाने दिली होती रक्कम

परळी , (दिव्य न्युज):- सरकारी शाळेत शिपाई आणि क्लर्क पदावर नोकरी लावतो, असे आमिष दाखवून धिरज बद्रीनारायण बाहेती आणि दीपा धीरज बाहेती या दाम्पत्याने दोघा तरुणांकडून तब्बल १२ लाख रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी बाहेती दाम्पत्यावर परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निसर्ग अनंतराव जमशेटटे (रा. कृष्णा नगर, परळी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ऑक्टोबर २०२३ मध्ये अनंत ढोपरे याने निसर्ग याला सांगितले ▶▶ पान २ वर

# जमीन विकली, एजेंटला ६५ लाख दिले

## २६ जानेवारीला आकाश फोनवर शेवटचं बोलला

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- भारतातून अमेरिकेत बेकायदेशीर स्थलांतरित झालेले १०४ भारतीय पुन्हा मायदेशी परतलेत. अमेरिकेतून डिपोर्ट करण्यात आलेल्या या भारतीयांना मॅक्सिको-अमेरिकेच्या सीमेवर पकडले होते. हे लोक भारतातून कायदेशीरपणे गेले परंतु डंकी रूटच्या माध्यमातून या लोकांनी




अमेरिकेत घुसखोरी केली. डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यानंतर त्यांनी अमेरिकेत बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्यांविरोधात मोहिम उघडली आहे. त्यातून ही कारवाई करण्यात आली.

आता अमेरिकेने त्यांच्या लष्करी विमानाने या १०४ भारतीयांना भारतात सोडले, यात अनेकांची स्वप्ने उद्ध्वस्त झालीत. हातात बेड्या घालून आलेल्या ▶▶ पान २ वर

# बनावट पिस्टलसह फोटो केला व्हायरल

## फोटोग्राफरसह दोघांवर कारवाई

बीड, (दिव्य न्युज):- बनावट पिस्टल हातात धरून काढलेला फोटो सोशल मीडियावर व्हायरल करणाऱ्या फोटोग्राफर आणि संबंधित व्यक्तीवर पिंपळनेर पोलिसांनी कारवाई केली आहे.

पोलीस स्टेशनला मिळालेल्या माहितीनुसार, सिध्दार्थ वक्ते (रा. नाथापूर, बीड) याने हातात पिस्टलसारखे दिसणारे शस्त्र घेऊन फोटो काढून सोशल मीडियावर व्हायरल केला. चौकशीत त्याने सांगितले की, हे पिस्टल फोटोग्राफर धनंजय हिंगे (रा. रानमळा, गेवराई) यांचे असून, ते केवळ फोटोशूटसाठी वापरण्यात आले होते.ोलिसांच्या तपासात ते शस्त्र प्रत्यक्षात एक खेळणी लायटर असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, अशा प्रकारे फोटो व्हायरल केल्याने जनतेत भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे दोघांविरोधात प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वांबर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि मधुसूदन घुगे व त्यांच्या टीमने केली.कोणीही हातात शस्त्र घेऊन मिरवताना किंवा अशा प्रकारचे फोटो व्हायरल करताना आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे सपोनि मधुसूदन घुगे यांनी स्पष्ट केले आहे.

# बस्ता बांधण्यासाठी निघालेल्या कुटुंबावर काळाचा घात्रा

## नवरी मुलीच्या वडिलांसह दोन ठार



केज , (दिव्य न्युज):- तालुक्यातील कासारी येथील कुटुंब बस्ता बांधण्यासाठी नगरला निघाले असता केज पासून जवळच असलेल्या सांगवी (सा.) पाटी जवळ (दि.७) गुरवार रोज अपघात होऊन मुलीच्या वडिलांसह एका महिलेला जीव गमावा लागला आहे.अधिक माहिती अशी कि, तालुक्यातील कासारी येथील रामेश्वर पान २ वर

### वैजनाथ बांगर व अभिषेक सानपला कर्नाटकातून अटक

# कृष्णा आंधळेचा पत्ता मिळणार?

धारूर, (दिव्य न्युज):- तरनळी येथील अशोक मोहिते नावाच्या तरुणाला वाल्मिक कराडच्या बातम्या का बघतोस म्हणून मारहाण करणाऱ्या वैजनाथ बांगर अभिषेक सानप यांच्या कर्नाटकमधून मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे.



केज तालुक्यातील धारूर पोलीस स्टेशन हद्दीमधील तरनळी गावामध्ये वाल्मिक कराडच्या बातम्या का बघतोस म्हणून अशोक मोहिते यास काल (ता.०५) लाथा-बुक्क्या, लोखंडी रॉड आणि कोयत्याने जबर मारहाण झाली होती. याप्रकरणी मावसभाऊ बालासाहेब भोसले यांच्या फिर्यादीवरून धारूर पोलीस स्टेशनमध्ये वैजनाथ बांगर, अभिषेक सानप या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदरील गुन्हा दाखल झाल्यापासून दोन्ही आरोपी फरार होते. मात्र येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी या गुन्ह्याचा तपास हाती घेत या दोन्ही आरोपींचा पाठलाग करत कर्नाटक येथून अटक केली.

# पेठ बीड भागातील विजेच्या प्रश्नासंदर्भात सलीम जहाँगिर यांनी घेतली कार्यकारी अभियंत्यांची भेट

## कुचकामी तारा, पोल, ओव्हरलोड डीपी बदलण्याची मागणी

बीड (दिव्य न्युज):- पेठ बीड भागात गेल्या काही महिन्यांपासून विजेचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ठिकठिकाणी विजेच्या तारा कुचकामी झाल्या असुन त्या लोंबकळत आहेत. यामुळे नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्याचबरोबर ओव्हरलोड डीपीमुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होऊ लागला आहे.

या प्रश्ना संदर्भात भाजप अल्पसंख्यांक प्रदेश महामंत्री सलीम जहाँगिर यांनी नागरीकांसह वीज कंपनीचे कार्यकारी अभियंता अविनाश सानप यांची भेट घेऊन हे प्रश्न तात्काळ सोडविण्याची मागणी केली. बीड शहरातील पेठ बीड हद्दीतील खुबा कॉलनी, तेलगाव रोड यासह इतर भागांमध्ये वारंवार वीजेची समस्या निर्माण होऊ लागली आहे. खुबा कॉलनीतील डीपी सध्या २०० के.वी.ची आहे. मात्र त्यावर ३०० के.वी.चा लोड असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडीत होऊ लागला आहे. सदरील डीपी तात्काळ बदलून त्या ठिकाणी ३०० के.वी.ची डीपी बसवावी. लोंबकळलेल्या तारा दुरूस्त कराव्यात, कुचकामी तारा आणि विद्युत पोल तात्काळ बदलण्यात यावेत अशी मागणी यावेळी सलीम जहाँगिर यांनी केली. यावेळी कार्यकारी अभियंता अविनाश सानप यांनी पेठ बीड भागातील शाखा ३ चे इंजि.उमेश कसबे यांना बोलावून या समस्या तात्काळ मार्गी लावण्याच्या सुचना केल्या. ▶▶ पान २ वर

# धनंजय मुंडेंच्या मुलाला वाल्मिक कराडचा प्रचंड राग आलेला फक्त पुरावे मागत होता

बीड , (दिव्य न्युज):- धनंजय आणि करुणा मुंडे यांचा मुलगा सीशिव मुंडे पहिल्यांदाच माध्यमांसमोर झळकला. करुणा



मुंडेंनी कौटुंबिक कोर्टामध्ये केस जिंकल्यानंतर गुरुवारी त्याने माध्यमांना प्रतिक्रिया देण्यास विरोध दर्शवला होता. त्यानंतर त्याने इन्स्टाग्रामवर पोस्ट करत वडिलांची बाजू घेतली होती. तर आईपासून आपल्याला आणि वडिलांना कसा त्रास होतो, हे सांगितलं होतं.

परंतु नऊ ते दहा महिन्यांपूर्वी करुणा मुंडेंना बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात ▶▶ पान २ वर




# बीडच्या एमआयडीसीसाठी आ.संदीपभैय्यांनी घेतली बैठक

## एमआयडीसी अधिकाऱ्यांची उपस्थिती, जागेचेही केली पाहणी



बीड, (दिव्य न्युज):- आज बीड एमआयडीसी बाबत शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेतली. बीड शहरातील एमआयडीसी चा विकास व्हावा या ठिकाणी मोठे मोठे उद्योग यावेत, यातून रोजगार निर्मिती व्हावी व आपल्या बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा यासाठी मागील आठवड्यात राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांची भेट घेतली होती.आज याबाबत एमआयडीसी विभागाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी मा.सोनाली मुळे, प्रादेशिक अधिकारी अधिकारी अमित भामरे व अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेतली. एमआयडीसी साठी जमिनीची पाहणी देखील झाली असून यापुढील काळात बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होईल यात शंका नाही.


# ६ खासदार ठाकरेंची साथ सोडणार?

## कोणाची नावं चर्चेत?; उद्धव ठाकरेंच्या खासदारांची संपूर्ण यादी!

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्रात पुन्हा मोठा राजकीय भूकंप होऊ घातला आहे. शिवसेना ठाकरे पक्षाचे सहा खासदार उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला जाऊन मिळणार असल्याची खात्रीलायक माहिती एबीपी माझाच्या हाती आहे. हे पक्षप्रवेश अगदी लवकरच होणार आहेत अशी सूत्रांची माहिती आहे. शिवसेनेनं ऑपरेशन टायगरची तयारी जवळपास पूर्ण झाल्याचं बोललं जात आहे.

उद्धव ठाकरेंचे ६ खासदार शिंदेंच्या संपर्कात आहेत. सध्या ठाकरेंचे ९ खासदार लोकसभेत आहेत. त्यापैकी ६ खासदार शिंदे गटात दाखल होऊ शकतात असं समजतंय. विधानसभा निवडणुकीतील दारूण पराभवानंतर ठाकरे गटात मोठी अस्वस्थता आहे. अनेकांना त्यांच्या राजकीय भवितव्याची चिंता लागली आहे. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेची साथ सोडत हे सहा खासदार शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचं समजतंय. ठाकरेंचे नेमकी कोणते सहा खासदार शिंदे गटात प्रवेश करणार त्यांच्या नावाची सध्या चर्चा रंगली आहे.

ऑपरेशन टायगरची चर्चा ही अनेक दिवसांपासून होती. मात्र खासदारांचं तळ्यात मळ्यात सुरू होतं. पक्षांतरबंदी कायद्यानुसार कारवाई रोखायची असेल तर ६ खासदारांनी पक्षप्रवेश करणं गरजेचं होतं. त्यामुळे ६ चा आकडा गाठण्यासाठी वेळ घेतला गेला. अखेर ६ खासदारांचं मन वळवण्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला यश आलं असून पडद्यामागे जुळणी झाल्याची माहिती आहे.



### शिवसेना ठाकरे गटाचे आमदारांची यादी

१) मेहकर- सिद्धार्थ खरात २) दर्यापूर - गजानन लवाटे ३) बाळापूर - नितीन देशमुख ४) वणी - संजय देरकर ५) परभणी - राहुल पाटील ६) विक्रोळी - सुनील राऊत ७) जोगेश्वरी पूर्व- अनंत (बाळा) नर ८) दिंडोशी - सुनील प्रभू ९) वर्सोवा - हरुन खान १०) कलिना - संजय पोतनीस ११) वांद्रे पूर्व - वरुण सरदेसाई १२) माहीम - महेश सावंत १३) वरळी - आदित्य ठाकरे १४) शिवडी - अजय चौधरी १५) भायखळा - मनोज जामसूतकर १६) खेड आळंदी - बाबाजी काळे १७) उमरगा - प्रवीण स्वामी १८) उस्मानाबाद - कैलास पाटील १९) बार्शी - दिलीप सोपल २०) गुहागर - भास्कर जाधव

### उद्धव ठाकरेंच्या खासदारांची यादी

**१) अरविंद सावंत- दक्षिण मुंबई लोकसभा २) अनिल देसाई- दक्षिण मध्य मुंबई लोकसभा ३) संजय दीना पाटील- ईशान्य मुंबई लोकसभा ४) संजय जाधव- परभणी लोकसभा ५) ओम राजेनिंबाळकर- धाराशिव लोकसभा ६) भाऊसाहेब वाकचौरे- शिर्डी लोकसभा ७) राजाभाऊ वाजे- नाशिक लोकसभा ८) संजय देशमुख- यवतमाळ-वाशीम लोकसभा ९) नागेश पाटील-आष्टीकर- हिंगोली लोकसभा**

---

### आलिशान शिवशाही बस म्हणजे पांढरा हत्ती पोसल्यासारखे..!

# परिवहन महामंडळाला महिन्याला कोटीचा तोटा; उत्पन्न ५० रुपये, खर्च ७२ रुपये

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटीकडे प्रवासी आकर्षित करण्यासाठी एसटीच्या ताफ्यात पाच वर्षांपूर्वी आलिशान शिवशाही गाड्या आल्या. रत्नागिरी विभागाला त्यातील ३४ गाड्या मिळाल्या. वातानुकूलित, आरामदायी गाड्यांना चांगला प्रतिसाद मिळेल, अशी महामंडळाची धारणा होती; परंतु शिवशाही बस म्हणजे पांढरा हत्ती पोसल्यासारखे झाले आहे.

शिवशाहीला प्रत्येक किमीला ५० रुपये उत्पन्न आहे, तर ७२ रुपये खर्च आहे. प्रत्येक किमीला २२ रुपयाचा तोटा या गाडीमुळे एसटी महामंडळाला सहन करावा लागत आहे. दिवसाला शिवशाही ५०० किमी फिरते. ३४ गाड्यांचा महिन्याचा तोटा काढला तर १ कोटी १२ लाखांवर जातो. त्यामुळे शिवशाही बस महामंडळाला सावरणारी नाही तर आर्थिक खड्ड्यात घालणारी ठरत आहे.

आधीच तोट्यात असलेले एसटी महामंडळ कोरोना महामारी आणि कर्मचाऱ्यांच्या संपामुळे पुन्हा आर्थिक खाईत लोटले गेले. काळानुरूप एसटी महामंडळाने कात टाकण्याचा प्रयत्न केला. प्रवाशांच्या मूलभूत गरजांचा विचार करून एसटीने खासगी आरामदायी गाड्यांशी स्पर्धा सुरू केली. लाल डब्याने कात टाकत सुरुवातीला नीमआराम गाड्या काढल्या. त्यानंतर टु बाय टू आसनाच्या गाड्या आल्या. विठाई, हिरकणी, मिडीबस, परिवर्तन बसेस आदी गाड्या एसटीच्या ताफ्यात आल्या; परंतु खासगी ट्रॅव्हल्सशी स्पर्धा करण्यासाठी त्या तोडीची बस ताफ्यात उतरवण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आणि २०१९-२०च्या दरम्यान महामंडळामध्ये आलिशान शिवशाही गाडी आली.

रत्नागिरी विभागाच्या वाट्याला यातील ३४ शिवशाही आल्या. पाच वर्षे झाली. या गाड्या अजूनही




सुस्थितीत आहेत; परंतु साध्या गाड्या आणि शिवशाही गाड्यांमध्ये मोठा फरक आहे. या गाड्या सेन्सरवर चालतात. सेन्सर खराब झाला तर गाडी बंद पडली. वातानुकूलित यंत्रणेचे स्वतंत्र काम करून घ्यावे लागते. उर्वरित काम करताना साध्या गाड्यांच्या तुलनेत या गाड्यांचे सुट्टे भाग (स्पेअर पार्ट) महागडे आहेत. प्रत्येक किमीला या गाडीचे उत्पन्न ५० रुपये आहे; परंतु खर्च ७२ रुपये आहे. शिवशाहीच्या प्रत्येक किमीला एसटीला २२ रुपये तोटा सहन करावा लागत आहे. वर्षाला सुमारे १ कोटी १२ लाख म्हणजे गेल्या पाच वर्षांमध्ये साडेपाच कोटींचा तोटा शिवशाहीमुळे महामंडळाला सहन करावा लागला आहे.

---

# पोलीस अधिकाऱ्यास ओरडून बोलल्याने आयपीसीच्या कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल होऊ शकत नाही मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल..!

बीड, (दिव्य न्युज):- अमर शिवाजीराव चव्हाण यांची बाजू ही एक एफ आय आर रद्द करण्यासाठीचा याचिका आहे अमर चव्हाण यांनी पोलीस अधिकाऱ्या समोर ओरडल्याने आयपीसीच्या कलम १८६ व ३५३ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने सदर खालील न्यायालयाच्या कामकाजात स्थगिती दिली आहे.न्यायमूर्ती. सारंग व कोतवाल आणि स.म मोडक आणि यांच्या खंडपीठाने हा निर्णय घेतला, ज्यांनी स्थगिती देण्याच्या प्रक्रियेतील प्रक्रियात्मक बाबी लक्षात घेतल्या.

कोल्हापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मुरगूड पोलीस ठाणे हद्दीत अर्जुननगर अर्जुनी ता. कागल जिल्हा कोल्हापूर येथे धनश्री कला, क्रिडा सांस्कृतीक व मनोरंजन या मंडळाचे येथे येवुन रितसर पहाणी करुन तेथे सुरु असलेला पैसे लावुन पत्याचे पानाचा जुगार हा बेकायदेशिर सुरु असल्याची खात्री झाल्याने आम्ही कायदेशिर कारवाई करत असताना सदर व्यवसायाचा मुळ मालक अमर शिवाजीराव चव्हाण यादवनगर ता. कागल जि. कोल्हापूर याने मी पोलीस महासंचालक यांचेकडुन परवाना घेतलेला आहे.

मी वेळावेळी पोलीस अधीक्षक यांना भेटलेलो आहे. मी तुमची तक्रार करणार आहे. मी तुम्हाला सोडणार नाही, मी तुमचे विरुध्द तक्रार करतो. माझेकडे पोलीसांनी येथे प्रवेश करायचा नाही असा न्यायालयाचा आदेश आहेत, तमच्यावर कन्टेम्पट ऑफ कोर्ट दाखल करतो असा धाक दाखवून हुज्जत घालुन त्याने आरडा ओरडा सुरु करुन सरकारी कामामध्ये त्याने व्यत्यय निर्माण केला आहे आयपीसीच्या कलम १८६ व ३५३ अन्वये एफ आय आर नोंदवली. मुंबई उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, ऋखठ आणि आरोपपत्रातील आरोपांचा विचार करता, आम्हाला याचिकाकर्त्याच्या वकीलाच्या युक्तीमध्ये प्राथमिक स्वरूपात तथ्य आढळते की, केवळ ओरडल्याने खझउ च्या कलम ३५३ अंतर्गत गुन्हा सिद्ध होणार नाही. त्यामुळे याचिकाकर्त्यावरील आयपीसी च्या कलम ३५३ अंतर्गत झालेला एफ आय आर बाबत खालील न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीस स्थगिती देत आहेत.

---

# धनंजय मुंडेंनी डीबीटी धोरणाला बगल का दिली?

### सदाभाऊ खोत यांचा सवाल

पुणे (दिव्य न्युज):- राजकीयदृष्ट्या अडचणीत आलेले अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आता भाजपच्या मित्रपक्षांनी आरोप करण्यास सुरुवात केली आहे. कृषी विभागात थेट हस्तांतरण लाभ (डीबीटी) धोरण लागू असताना तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी या योजनेला का बगल दिली? असा प्रश्न उपस्थित करून यात हात मारता येत नसल्याने थेट खरेदी करण्यात आली का, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे? असा सवाल रयत शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी केली. याबाबत विधानसभेत आवाज उठवू, असेही ते म्हणाले.

विभागीय आयुक्त कार्यालयात ते पत्रकारांशी बोलत होते. खोत म्हणाले, देशात तसेच राज्यातही २०१५ नंतर शेतकऱ्यांना डीबीटीद्वारे अनुदान वाटप करण्याचे धोरण अवलंबलेले आहे. असे असताना सरकारने ही उठाठेव का केली. कुठल्या तरी एकाच कंपनीमार्फत खत खरेदी करावे, खरेदी करण्यासाठी दलाल नेमावे आणि या दलालांना शेतकऱ्यांना पैसे वाटावे. हे कशासाठी करण्यात आले. डीबीटीचे धोरण बाजूला ठेवून थेट खरेदीचा घाट का घालण्यात आला. हे चुकीचे आहे. तंत्रज्ञानावर तुमचा विश्वास नाही का?

आता सगळ्यांच्या हातात मोबाइल आले आहेत. पानटपरीवाले सुद्धा पैसे गुगल पेच्या माध्यमातून घेत आहेत. एवढ्या सुविधा मिळत आहे. तंत्रज्ञान पुढे



गेले आहे असताना डीबीटीचे धोरण बाजूला ठेवून थेट खरेदीचा घाट का घालण्यात आला. हे चुकीचे आहे. तंत्रज्ञानावर तुमचा विश्वास नाही का, तुम्हाला हात मारता येत नव्हता का म्हणून थेट खरेदी राबविली का? असा आरोप करत हे सगळं स्पष्ट होणे गरजेचे आहे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.या प्रकरणाने राज्याची मान खाली गेली आहे. शेतकऱ्याबद्दल संवेदना कधी दाखवणार की नाही? असा सवाल उपस्थित करत मातीशी इमान राखून काम केले पाहिजे, असा सल्लाही त्यांनी दिला. काही लोक हे करत नाहीत. मुंडे यांचा राजीनामा देणे घेण हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. मात्र, जो कोणी शेतकऱ्यांच्या अन्नात विष घालत असेल तर त्याच्या विरोधात आम्ही आहे. या विरोधात विधानसभेत आवाज उठवणार असल्याचा इशारा, खोत यांनी दिला.

---

पान १ वरून

## आली रे आली.

यापुढे त्यांच्या नावाचा कोणत्याही गुन्ह्यात उल्लेख झाला, तर त्यांच्यावर मकोका आणि एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात बेईल, असे स्पष्ट सांगितले आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. याआधीही पोलिस अधीक्षक कॉवत यांनी वाळू माफियांवर कठोर कारवाई केली होती. आता हा इशारा देताच गुन्हेगारीवर आळा बसेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून कठोर पावले उचलली जात असून, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना थेट मोकोका आणि एमपीडीए अंतर्गत कारवाईला सामोरे जावे लागेल. त्यामुळे गुन्हेगारी विश्वात खळबळ उडाली आहे.

पोलीस अधिक्षक नवनीत कौवत यांनी एकापाठोपाठ एक धडक ॲक्शन घ्यायला सुरुवात केली आहे. आठवडाभरापुर्वीच ५१ वाळू माफियांना बोलावून त्यांची परेड घेत पोलीसी खाक्यात समज दिल्यानंतर आता गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेल्या गुंडांची बारी आल्याचे दिसुन येत आहे. जिल्हाभरातील पोलीस ठाण्यांच्या रेकॉर्डवर असलेल्या गंभीर गुन्ह्यातील ८० जणांना पोलीस अधिक्षक कॉवत यांनी आज दुपारी बोलावून घेतले होते. जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेल्या रेकॉर्डवरील व्यक्तींना संबंधीत ठाणेप्रमुखांनी बोलाऊन घेतले होते. त्या अनुषंगाने दुपारी उशिरापर्यंत अनेकजण पोलीस अधिक्षक कार्यालयात दाखल होत होते. दरम्यान आजच्या या परेडच्या माध्यमातून पोलीस अधिक्षक यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना थेट मोकोका आणि एमपीडीए अंतर्गत कारवाईला सामोरे जावे लागेल असे स्पष्ट आव्हान केले आहे.

## नोकरीच्या आमिषाने

की, धिरज बद्रीनारायण बाहेती (रा. परळी) यास परळी तालुक्यातील मौजे रेवली येथे 'शाहू फुले आंबेडकर' नावाने शाळा मंजूर झाली आहे. तिथे माझे क्लर्क म्हणून काम होत असून शिपाई पदासाठी जागा रिक्त आहे. मात्र, त्यासाठी १२ लाख रुपये भरावे लागतील, त्यापैकी ६ लाख रुपये लगेच आणि उर्वरित ऑर्डर आल्यानंतर भरावे लागतील. या माहितीनंतर निसर्ग आणि त्याच्या वडिलांनी विकासराव डुबे यांच्यासह धिरज बद्रीनारायण बाहेती याची भेट घेऊन खातरजमा केली. बाहेतीने ही ऑफर खरी असल्याचा दावा केला आणि त्याच्या पत्नी दिपा बाहेती व उमेश तपके यांच्याशी संपर्कात राहण्यास सांगितले.

शेती विकून दिले ६ लाख रुपये!

नोकरीच्या आशेने निसर्गच्या वडिलांनी तब्बल ८ लाखांना एक एकर शेती विकली आणि २ ऑक्टोबर २०२३ रोजी मोंढा मार्केटमधील 'बाहेती ऑफसेट' येथे जाऊन ६ लाख रुपये रोख स्वरूपात दिले. यावेळी धिरज बाहेती, दिपा बाहेती आणि उमेश तपके हे उपस्थित होते. पैसे घेताना बाहेतीने काम न झाल्यास बँकेच्या व्याजाप्रमाणे रक्कम परत करण्याचे आश्वासन दिले. ठरलेल्या प्रमाणे १५ जून २०२४ रोजी निसर्ग आणि अनंत यांनी उमेश तपके यांना भेटून जॉइनिंग ऑर्डरची विचारणा केली. मात्र, धिरज बाहेती आणि दिपा बाहेती परळी सोडून फरार झाले असल्याची माहिती मिळाली. जुलै २०२४ मध्ये धिरज बाहेतीने संपर्क साधून तुम्ही हायपर होऊ नका, लवकरच पैसे देतो असे सांगितले. मात्र, त्यानंतर त्याचा संपर्कच तुटला. पीडितांनी पोलिसांकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला असता, दिपा बाहेती हिने फोन करून एक महिना थांबा असे सांगितले. मात्र, अद्याप रक्कम परत करण्यात आलेली नाही. त्यामुळे मला शिपाई म्हणून तर अनंत ढोपरे यास क्लार्क म्हणून नोकरी लावण्यासाठी प्रत्येकी सहा लाख घेऊन एकूण १२ लाखांची फसवणूक झाल्याची तक्रार निसर्ग जमशेटटे यांनी परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात दिली. त्यांच्या तक्रारीवरून धिरज आणि दीपा बाहेती या दोघांवर फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आला.

## जमीन विकली, एजेंटला

वेगवेगळी आहे. प्रत्येकजण त्यांचा अनुभव सांगत आहेत. यातील अनेकांच्या डोक्यावरचं छप्पर नसल्याने काहींनी नातेवाईकांच्या घरी आश्रय घेतला आहे. २० वर्षीय युवक आकाशची कहाणीही

अशीच आहे. जो करनालच्या घरौडा गावचा रहिवासी होता. आकाशने देशाबाहेर जाण्याचं स्वप्न पाहिले होते. आकाशच्या हट्टापुढे घरचेही नरमले, त्यांनी कुटुंबातील जमिनीचा अडीच एकर तुकडा विकून आकाशला पाठवण्याची व्यवस्था केली.

६५ लाख एजेंटला दिले आणि ६-७ लाख वेगळा खर्च झाला

आकाशला अमेरिकेत पाठवण्यासाठी एजेंटला ६५ लाख देण्यात आले त्याशिवाय इतर खर्चासाठी ६-७ लाख देण्यात आले. आकाश १० महिन्यापूर्वी गेला होता. २६ जानेवारीला त्याने मॅक्सिको सीमेवरील भिंत ओलांडून अमेरिकेत पोहचला होता मात्र तिथे त्याला पकडण्यात आले. डंकी रूटचे २ मार्ग आहेत. एक थेट मॅक्सिको आणि दुसरा भिंत ओलांडून अमेरिकेत, मात्र तिथपर्यंत पोहचण्यासाठी अनेक देशातून फ्लाईट, टॅक्सी, कॅंटर, बस, जंगल, समुद्र पार करून जावे लागते. आकाशला मॅक्सिकोला पोहचवण्याचे पैसे एजेंटने घेतले परंतु त्याला दुसऱ्या मार्गाने पाठवले. आकाशनं त्याच्या भावाला अनेकदा कॉल करून व्हिडिओ दाखवले जे जंगलातील होते, याच रस्त्याने आकाशला पुढचा प्रवास करावा लागला.

भिंतीवरून उडी मारून अमेरिकेत पोहोचला आणि...

२६ जानेवारीला आकाशचं कुटुंबासोबत अखेरचं बोलणं झाले जेव्हा तो मॅक्सिकोमधील भिंतीवरून उडी मारून अमेरिकेत पोहचला होता, त्यावेळी त्याला सुरक्षा जवानांनी पकडले होते. त्यानंतर काही काळ त्याला रिमांडमध्ये घेऊन डिपोर्टच्या प्रक्रियेनुसार कागदपत्रावर सही करून घेतली. आकाश परत येतोय हे त्याचा भाऊ शुभमला बुधवारी कळाले. २६ जानेवारीनंतर त्याच्याशी कुठलाच संपर्क झाला नाही. अमेरिकेला जाण्यासाठी आकाशला ७२ लाखांचा खर्च आला होता. डिपोर्ट होऊन आकाश सकाळी त्याच्या भारतातील राहत्या घरी पोहचला. आता कुटुंबाने संबंधित एजेंटवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

डंकी रूट म्हणजे बेकायदेशीरपणे परदेशात जाण्याचा मार्ग, त्यात लोक अनेक देशातून प्रवास करत बेकायदेशीरपणे अमेरिका, कॅनडा आणि युरोपात घुसखोरी करतात. हे लोक टूरिस्ट व्हिसा अथवा एजेंटच्या मदतीने अमेरिकेजवळील कुठल्या तरी देशात जसं ब्राझील, इक्काडोर, पनामा अथवा मॅक्सिकोपर्यंत पोहचतात. तिथून जंगल, नदी, वाळवंट या मार्गाने पायपीट करत अमेरिका मॅक्सिकोच्या बॉर्डरवर पोहचतात. त्यानंतर एजेंटच्या मदतीने अमेरिकेत बेकायदेशीर घुसखोरी करतात.

## बस्ता बांधण्यासाठी

शाहूराव डोईफोडे यांच्या मुलीचे लग्न (दि.२३ फेब्रुवारी) रोजी होते. त्यामुळे मुलीचे वडील मुलीसह इतर नातेवाईकांना घेऊन नगरला बस्ता बांधण्यासाठी निघाले होते. मात्र सकाळी आठच्या सुमारास ते केज-बीड रोडवरील सांगवी पाटी जवळ गेले असता पुलाच्या पुढील वळणावर जीपचा आणि अन्य एका वाहनाचा अपघात झाला. आणि यामध्ये मुलीचे वडील आणि शिक्षक श्रीराम घुले यांच्या पत्नी उर्मिला घुले यांचे अपघाती निधन झाले.

## धनंजय मुंडेंच्या मुलाला

मारहाण झाली होती. तेव्हा सीशिव मुंडे प्रचंड संतापला होता. त्याने वडील धनंजय मुंडेंना कॉन्फरन्स कॉलवर घेऊन याबाबत विचारणा केली होती. तेव्हा धनंजय मुंडेंनी करुणा मुंडे खोटं बोलत असल्याचं म्हटलं त्यावर सीशिवचं समाधान झालं नाही. त्याने आईकडे पुरावे मागितले.

करुणा मुंडे यांनीच या घटनेबाबत सांगितलं आहे. सीशिवने केलेली पोस्ट, धनंजय मुंडेंची भूमिका आणि बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात घडलेला प्रकार. याबाबत करुणा मुंडेंनी सविस्तर भूमिका स्पष्ट केली आहे. त्या 'एबीपी माझा'वर बोलत होत्या. यावेळी त्यांनी पंकजा मुंडेंबद्दलही आपल्याकडे भरपूर माहिती असल्याचं म्हटलंय.

करुणा मुंडे म्हणाल्या की, माझ्या आईचं निधन झालं तेव्हा पूर्ण कुटुंबावर धनंजय मुंडेंनी प्रेशर टाकलं होतं. त्यानंतर बहिणीची साथ देऊ नका म्हणून माझ्यावर २०२१ दबाव होता. आज माझ्या मुलांना माझ्याविरोधात उभं केलं जात आहे. धनंजय मुंडेंची सवय आहे फूट पाडा आणि राज्य करा. छोट्या मुलाला जवळ करताय आणि मीडियासमोर आणताय, इतक्या छोट्या मुलाला त्रास दिला जातोय. जर उद्या आमचं काही बरंवाईट झालं तर कोण जबाबदार?

१९९६ पासून आजपर्यंत पंकजा मुंडेंनी धनंजयसोबत काय केलं, धनंजयने पंकजासोबत काय केलं, हे सगळं कटकारस्थान मी सांगेन. मुंडे साहेबांसोबत यांनी काय-काय कटकारस्थान रचले, यांचे किती आका आहेत, कुठे-कुठे आहेत.. हे सगळं मी तोंड उघडणार.माझ्याकडे खूप मोठ-मोठ्या गोष्टी आहेत. जर मी तोंड उघडलं तर पंकजाताईंचंही मंत्रिपद जाऊ शकतं, इतकं माझ्याकडे आहे. माझ्या नवऱ्याला त्रास दिला होता. मी २७ वर्षे त्यांच्यासोबत बायको म्हणून राहिली आहे, हे विसरुन तो (धनंजय मुंडे) कटकारस्थान रचत आहे. धनंजय मुंडेला बोलायचं असेल तर मी कॅबिनेट मीटिंगमध्ये येऊन बोलणार. कारण मी आताही बायको आहे, तलाख झालेला नाही. मला तो रस्त्यावर सोडू शकत नाही.

करुणा मुंडे म्हणाल्या की, बीडच्या कलेक्टर ऑफिसमध्ये वाल्मिक कराडने मला मारहाण केली होती. मी काम घेऊन गेली होती. तिथे कलेक्टर होते, धनंजय मुंडे होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये बोलावून घेऊन मला मारहाण केली. त्यानंतर मी एसपी, डीजी, देवेंद्र फडणवीस सगळ्यांना निवेदन दिलेलं आहे.

''तेव्हा मी माझ्या मुलाला याबाबत सांगितलं होतं, धनंजय मुंडेही कॉन्फरन्स कॉलवर होते. बेटा मला मारहाण झालीय, गुंडांकडून.. तर धनंजय मुंडे म्हणाले ही खोटं बोलतेय. त्यावर माझ्या मुलाने म्हटलं, मला पुरावे आणून दे, मग मी बघतो वाल्मिक कराडकडे.. माझ्या आईला कसं मारलं, हे कळू द्या त्यानंतर मला काय करायचंय ते करतो.'' असं सीशिव मुंडे म्हणाल्याचं करुणा मुंडेंनी सांगितलं.

करुणा मुंडे पुढे म्हणाल्या, मारहाणीच्या पुराव्यासाठी मी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिलं, सीसीटीव्ही फुटेज मागितलं. ९-१० महिने झाले, आजपर्यंत मला ते सीसीटीव्ही फुटेज मिळालेलं नाही, हा आपला कायदा आहे. आता मी कुणाकडेही काही मागणी करणार नाही. फडणवीस, अजितदादा यांना महिलांबद्दल जराही सहानुभूती असेल तर त्यांना मंत्रिमंडळातून, पक्षातून हाकलून द्या. असे लोक पक्षाला डाग आहेत. मोठ्या लोकांचा आसरा घेऊन माझ्यासारख्या बायकोवर आणि मुलांवर ते अन्याय करीत आहेत.